# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार व अति. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी व मुर्तिकारांची आयोजित बैठक संपन्न**

दिनांक ०५ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहा. आयुक्त योगेश गुणीजन, सहा. आयुक्त संजय दोंदे, सहा. आयुक्त जितेंद्र कांबळे, सहा. आयुक्त स्वप्नील सावंत, सहा. आयुक्त प्रियंका भोसले यांच्या उपस्थितीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ साजरा करणेबाबत नगरभवन, भाईंदर पश्चिम येथे विशेष बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी व मूर्तिकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच शाश्वत पद्धतीने पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कटिबद्ध आहे. विशेषतः प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तीवर प्रभावीपणे बंदी घालण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. 12 मे 2022 रोजी जारी केलेल्या मूर्ती विसर्जनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे ही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत. पर्यावरण संवर्धनाबाबत मुर्तीकारांनी नैसर्गिक व पर्यावरणपूरक रंगद्रव्यांचा वापर करणे, शाडूच्या मातीचा विशेषतः वापर करणे, पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करून घरगुती व सार्वजनिक मूर्तीची उंची चार फुटापर्यंत ठेवणे, मूर्तिकारांनी शाडू माती किंवा पर्यावरणपूरक मूर्तीच्या उजव्या खांद्याच्या मागील बाजूस एक इंचाचे हिरवे वर्तुळ लावून चिन्हांकित करणे इत्यादी सूचना मुर्तिकारांना देण्यात आल्या. उपरोक्त सूचनांचे पालन व्हावे यासाठी महानगरपालिकेची प्रभाग समिती निहाय पथके प्रत्यक्ष तपासणी करणार असल्याचे नमूद करण्यात आले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तसेच घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकोल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांपासून बनविलेल्या मूर्ती खरेदी करणेत येऊ नये तसेच सदर मुर्तीची उंची 4 फूटांपेक्षा कमी असावी. मूर्ती ही पारंपारिक शाडू माती, कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेली असावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने बॅनर, पोस्टर आदीसह प्लॅस्टिक आधारित सजावटीचा वापर टाळून त्याऐवजी कापड, पुनर्वापर केलेला कागद लगदा इ. पर्यावरणपूरक साहित्याने मंडप सजवावेत. उत्सवादरम्यान निर्माण होणारे सर्व निर्माल्याचे वर्गीकरण करुन योग्य ती विल्हेवाट लावली जाईल याची खात्री करावी. सेंद्रिय (निर्माल्य) आणि नॉन-बायोडिग्रेडेबल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरावे. सार्वजनिक गणपती मंडळांनी तसेच घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नागरिकांनी आपल्या आवारात महानगरपालिकेने बांधलेल्या तात्पुरत्या/कृत्रिम तलावांमध्येच मूर्तीचे विसर्जन होईल याचे नियोजन करावे. ध्वनी प्रणालीचे प्रमाण मर्यादित ठेवून आणि लाऊडस्पीकरसाठी निश्चित केलेल्या वेळेचे पालन करून ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व निवासी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कल्याणकारी संघटना, मूर्तीकार आणि कुटुंबांनी उत्सवांपूर्वी, उत्सवादरम्यान व उत्सवानंतर या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून उत्सवांचा पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होईल असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.